सोलापूर-- सोलापूर पुणे हायवे सोलापूर विद्यापीठ समोरील महापालिकेच्या जागेच्या ठिकाणी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने महामार्ग सुविधा केंद्र उभारण्यात येणार असून त्यासाठी ई लीलावा मध्ये डिपॉझिट घेऊन 29 वर्षासाठी देण्यासाठी नियोजन करण्यात आले होते. आज ई लिलावची शेवटची तारीख असून या लिलावासाठी कोणीही प्रतिसाद मिळाला नसून त्यासाठी पुन्हा दहा दिवस मुदतवाढ देण्यात आली आहे. पुणे नाका येथे उभारण्यात येणाऱ्या महामार्ग सुविधा केंद्र यासाठी प्रति स्क्वेअर मीटर 5300 डिपॉझिट हे परत न करणे योग्य (नॉन रिफंडेबल) भरावे लागेल व त्या ठिकाणाचे दुकानाचे भाडे कमीत कमी प्रति चौरस मीटर हे 203 रुपये असे ठेवण्यात आले आहे. तसेच त्या ठिकाणी दुकाने असून त्यासाठी 55 रुपये चौरस मीटर पासून ते 170 चौरस मीटर पर्यंत वेगवेगळे दर उपलब्ध करण्यात आले आहेत. ई-- लिलावच्या माध्यमातून 29 वर्षासाठी ही जागा लीजवर देण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. तसेच मनपा शाळा क्रमांक 27 येथील तिसरा, चौथा व पाचवा मजला असे तीन मजले ई लिलावाद्वारे प्रक्रिया 29 वर्षाच्या लीजवर देण्याकरिता राबवण्यात येत आहे. त्या ठिकाणी दुकानाचे दर हे 150 प्रति चौरस मीटर पासून ते 570 प्रतिचौरस मीटर पर्यंत वेगवेगळे दुकाने तसेच टेरेस हॉटेल उपलब्ध करण्यात येणार आहे. त्यासाठी डिपॉझिट प्रतिचौरस मीटर 1800/- रुपये असून 323/- प्रतिचौरस मीटर हे भाडे ठेवण्यात येणार आहे. अशी माहिती महापालिका आयुक्त पि.शिवशंकर यांनी दिली आहे. येत्या 13 जानेवारी ई-लिलाव ठेवण्यात आले आहे.